महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२-२२८१४९०६
Email ID:vasant.valtc@nic.in

क्र.रानिस-२०२४/प्र.क्र.४२/का-०३ दिनांक :-२९ फेब्रुवारी, २०२४.

प्रति,

मा. महाप्रबंधक,
उच्च न्यायालय,
मुंबई.

**विषय:- महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ च्या नियम ९०(१) अन्वये नामांकने सादर करणेबाबत.**

**संदर्भ:-** शासन अधिसूचना, महिला व बाल विकास विभाग, दिनांक २३ जुलै, २०२१

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन शासन अधिसूचनेन्वये राज्य निवड समितीचा कार्यकाल दि. २२.०७.२०२४ रोजी संपुष्टात येत आहे. याअनुषंगाने बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समितीच्या सदस्यांची निवड करणेसाठी स्थापित करावयाच्या निवड समितीची रचना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील नियम ९० व ९१ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार निवड समितीच्या अध्यक्षपदी मा. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमुर्ती यांचेशी चर्चा करुन उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश यांची नियुक्ती करणेबाबत तरतुद आहे.

विषयांकित प्रकरणी निवड समिती अध्यक्षांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तरी निवड समितीच्या अध्यक्षपदी नियुक्तीसाठी मा. उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांची नामांकने शासनास उपलब्ध करण्यात यावीत, ही विनंती.

आपला,

(प्र. वि. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) संग्रहार्थ कार्यासन-०३